# शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा (३१०)

**GOVERNMENT COLLEGE OF EDUCATION, BULDANA (310)**

**(Affiliated By: - Sant Gadge Baba Amaravati University, Amaravati)**

**Dr. N. B. Chavan** **Phone No. 07262299096**

**Principal (I/C)**

NAAC Acridited with Gread "A" (CGPA ३.१२)

**Web Site :www.gcebedbuldhana.edu.in** **Email : gcebedbuldana@gmail.com**


जा.क्र. शाअमवि/Buldhana/ 2026/CAP/IR-List 1st / **Date: 21/10/2026**

नियमित बी. एड. केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०२६

संस्था स्तरीय प्रवेश फेरी नियमावली व वेळापत्रक

सर्व उमेदवार,

शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा येथे नियमित बी. एड. केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०२६ च्या संस्था स्तरीय प्रवेश फेरीसाठी एकूण ३० जागा रिक्त आहेत. सदर जागा बी. एड. केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीने वेळोवेळी प्रसारित केलेल्या अधिसूचनानुसार दि.२१ ते २३ ऑक्टो.२०२६ दरम्यान आयोजित केलेला असून पुढील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी संपर्क करावा.

१. प्रवेश शासनाच्या व संबंधित विद्यापीठाच्या प्रचलित नियमांनुसार आणि उपलब्ध जागांनुसार देण्यात येईल. महाविद्यालाय्च्या एकूण ३० रिक्त जागांसाठी एकास पाच या प्रमाणात १५० उमेदवारांची यादी तयार करण्यात आलेली आहे.
२. गुणवत्ता यादया विद्यार्थ्यांचा गुणवत्ता क्रमांक, उपलब्ध जागा आणि लागू असलेल्या प्रवेश नियमांनुसारच तयार करून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे सर्व उमेदवारांनी त्या यादीचे अवलोकन करावे.
३. प्रवेशाचे संपूर्ण निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर दर्शविलेल्या रिक्त जागेसाठी दि.२१/१०/२०२६ ते २३/१०/२०२६ रोजी दुपारी १२ ते ०४ या वेळेत संपूर्ण कागदपत्रांसह महाविद्यालयात स्वत: हजर राहावे.
४. दि.२१/१०/२०२६ रोजी प्रवेशित झालेल्या जागांव्यतिरिक्त रिक्त शिल्लक जागांवर दि. २२/१०/२०२६ रोजी उपरोक्त नियमानुसार दु.१२. ते ०४ या वेळेत प्रवेश होतील.
५. दि. २३/१०/२०२६ रोजी उर्वरील सर्व जागा स. ११.०० ते ०५.०० या वेळेत भरल्या जातील.
६. आवश्यक कागदपत्र अपूर्ण असल्यास अथवा सदोष असल्यास प्रवेश दिला जाणार नाही.
७. प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या कालावधीत महाविद्यालयात पूर्णवेळ आणि नियमित उपस्थित राहण्याच्या अटीवर प्रवेश दिला जाईल.
८. उमेदवारांनी सीईटी अर्जाची प्रत, गुणपत्रिका, शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) व इतर आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत.
९. प्रवेशासाठी पात्रता व कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच प्रवेशाचा विचार करण्यात येईल.
१०. उमेदवारांनी प्रवेश शुल्क भरण्यासाठी आवश्यक व्यवस्था ठेवावी.
११. अपूर्ण कागदपत्रे, चुकीची माहिती किंवा पात्रतेच्या अटींची पूर्तता न झाल्यास प्रवेश नाकारला जाऊ शकतो.
१२. स्पॉट राउंडमध्ये सहभागी झाल्याने प्रवेश निश्चित होईलच, असे नाही.
१३. प्रवेश प्रक्रियेदरम्यान महाविद्यालय प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

स्थळ: शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा

सूचना: प्रवेशासंदर्भातील अंतिम निर्णय शासनाचे व संबंधित प्रवेश प्राधिकरणाचे प्रचलित नियम आणि अधिकृत सूचनांनुसार घेतला जाईल.

21/10/2026

प्रा. डॉ. एन. बी. चव्हाण

प्र. प्राचार्य